महाराष्ट्र शासन

# कै. गंगाराम जानू आवारी गुरुजी,
# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, (आदिवासी) पेठ

बलसाड रोड, दुरसंचार निगम कार्यालयाजवळ, पेठ ता. पेठ जि.नाशिक - 422208

WWW.DVET.GOV.IN E-mail : iti.peth@dvet.gov.in / itipeth@gmail.com ☎ 02558-295989

जा. क्र. औप्रसंपे/आस्था/2025/258 दिनांक :- 08/04/2025

**आदेश :-**

या संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांना कळविण्यांत येते की, संस्थेतील कर्मचाऱ्यांना शासकीय कामकाजासाठी वरीष्ठ कार्यालयामार्फत विविध कार्यालयामध्ये उपस्थित राहण्याबाबत दुरध्वनी संदेशाद्वारे परस्पर अथवा आदेशान्वये सुचीत करण्यांत येत असते. अशावेळी संबंधीत कर्मचारी हे कार्यालयप्रमुखांना अवगत न करता तसेच पुर्वपरवानगी न घेता परस्पर सदरच्या शासकीय कामासाठी उपस्थित राहत असल्याची बाब निर्दशनास आलेली आहे.

**जरी सदरचे कामकाज हे शासकीय व वरीष्ठ/इतर कार्यालयाकडून देण्यांत आलेले असले, तरी सदर बाब कार्यालयप्रमुख यांना अवगत करणे हे देखील संबंधीत कर्मचारी यांचे कर्तव्य आहे.**

तरी या आदेशान्वये संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांना आदेशित करण्यांत येते की, यापुढे ज्या कर्मचाऱ्यांच्यासंबंधीत वरीष्ठ कार्यालय अथवा इतर कोणत्याही कार्यालयाकडून अशा प्रकारची सुचना, आदेश (लेखी/मौखीक) प्राप्त झालेल्या आहेत, अशा कर्मचारी यांनी त्यांचेकडे असलेल्या अथवा वरीष्ठ कार्यालयाकडून सोपविण्यांत आलेल्या शासकीय कामकाजात अडथळा निर्माण होऊ न देता निम्नस्वाक्षरीकारांना प्रत्यक्ष अथवा दुरध्वनीद्वारे अवगत करुन त्याबाबतचा लिखीत/मौखिक आदेश प्राप्त करुन घेऊनच संबंधीत कामासाठी उपस्थित रहावे.

तसेच विनापरवानगी संबंधीत कर्मचारी परस्पर अशा कामासाठी उपस्थित राहिल्यास व त्यादरम्यान काही अनुचीत प्रकार घडल्यास सदरचे कार्यालय त्यासाठी जबाबदार राहणार नाही.

प्राचार्य
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पेठ
ता. पेठ, जि. नाशिक

प्रति,
संस्थेतील सर्व कर्मचारी

प्रत :-
1. मा. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.
2. मा. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.
2. श्री. एम. ई. बोरसे, गटनिदेशक यांना पुढील कार्यवाहीसाठी.